MHAU060000622004

**आर.डी.क्र. १०/२००४ मधील नि.क्र. १३८  खालील आदेश**
**विठाबाई शंकर भोजणे विरुध्द गोबा लालचंद पवार**

१.	सदर अर्ज धनको यांनी ऋणको क्र.१ गोबा लालचंद पवार चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. ऋणको क्र.१ गोबा लालचंद पवार हे दिनांक १०.०७.२०२२ रोजी मयत झाले आहे. त्यांच्या निधनानंतर अर्जात नमुद केलेले त्यांचे वारस नारायण गोबा पवार व मिराबाई गोबा पवार हे अभिलेखावर घेणे करीता धनको याने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२.	सदर अर्जावर ऋणको तर्फे विधीज्ञ यांनी मागील बाजुस म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, ऋणको क्र.१ यास फक्त दोन वारस नसुन १. नारायण पवार, २. झासीबाई राठोड, ३. धुपीबाई राठोड, ४. सखुबाई राठोड, ५. गिताबाई राठोड, ६. मिराबाई राठोड, ७. विमलबाई राठोड, ८. कमलाबाई राठोड अशी एकुण आठ वारस आहेत. सबब, धनको यांचा अर्ज कायदेशीर नसल्याने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३.	अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.  युक्तीवाद ऐकला.

४.	धनको यांनी सदरची दरखास्त ऋणको यांच्या कडुन वाद मिळकतीचा ताबा मिळणेकामी दाखल केलेला आहे. धनको यांच्या कथनानुसार ऋणको क्र. १ गोबा लालचंद पवार हे दिनांक १०.०७.२०२२ रोजी मयत झालेले आहे. त्यांच्या कथनांच्या पृष्टयार्थ धनको यांनी निशाणी १३७ कडे गोबा लालचंद पवार यांचे मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता गोबा लालचंद पवार यांचा मृत्यु दिनांक १०.०७.२०२२ रोजी झालेला आहे. धनको यांनी सदरचा अर्ज मुदतीत दिलेला आहे. ऋणको क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता धनको यांनी योग्य तो आदेश होण्याची विनंती केलेली आहे. उलटपक्षी ऋणको यांनी असा युक्तीवाद केलेला आहे की, गोबा लालचंद पवार यास धनको कथन करत असल्याप्रमाणे दोन वारस नसुन १. नारायण पवार, २. झासीबाई राठोड, ३. धुपीबाई राठोड, ४. सखुबाई राठोड, ५. गिताबाई राठोड, ६. मिराबाई राठोड, ७. विमलबाई राठोड, ८. कमलाबाई राठोड अशी एकुण आठ वारस आहेत. त्यामुळे धनको यांना त्यांच्या इच्छेनुरुप वारसांना अभिलेखावर घेता येणार नाही असा युक्तीवाद करुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची

विनंती केली आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, गोबा लालचंद पवार यांचा मृत्यू दि.१०.०७.२०२२ रोजी झालेला आहे. धनको याने अभिलेखावर नारायण गोबा पवार व मिराबाई गोबा पवार असे दोन वारस घेणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु ऋणको याने गोबा लालचंद पवार यास नारायण पवार व मिराबाई पवार व्यतिरिक्त १. नारायण पवार, २. झासीबाई राठोड, ३. धुपीबाई राठोड, ४. सखुबाई राठोड, ५. गिताबाई राठोड, ६. मिराबाई राठोड, ७. विमलबाई राठोड, ८. कमलाबाई राठोड अशी एकुण आठ वारस आहेत. परंतु सदर कथनाच्या पुष्ठर्थ ऋणको याने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदरचा अर्ज न्यायनिर्णयीत करत असतांना तोंडी युक्तीवादावर भिस्त ठेवुन गोबा लालचंद पवार यास नारायण पवार व मिराबाई पवार व्यतिरिक्त इतर आठ वारस आहेत असे म्हणता येणार नाही. धनको कथन करीत असल्याप्रमाणे वारसांना अभिलेखावर घेतल्यास ऋणको यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदर मयत गोबा लालचंद पवार यांच्या वारसांना दाव्यात पक्षकार करुन त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच धनको यांच्या वारसांना अभिलेखावर घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. धनको यांचा नि.क्र. १३८ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. धनको यांनी विहीत मुदतीत दुरुस्ती करावी.

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2022.09.06 15:22:17 +0530

**(ए. आय. आवटी)**

दिनांक–०३.०९.२०२२

सह, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (कोर्ट न.२)
कन्नड

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. S. Takalkar |
| Court | : | A. I. Awati<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C, Kannad. |
| Date | : | 03.09.2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 03.09.2022 |
| Order uploaded on | : | 06.09.2022 |
| Order is digitally signed on | : | 03.09.2022 |

.........................................................................